जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email-cp.thane.pro@mahapolice.gov.in

''प्रेस नोट'' दिनांक : १४/०५/२०२६

''बसमध्ये प्रवासादरम्यान/ सार्वजनीक ठिकाणी बॅगेमधुन सोने व इतर मौल्यवान वस्तुंची चोरी करणा-या सराईत महीला आरोपीतांस अटक करून त्याचेकडुन चोरी केलेले ३७,१९,०००/- रूपये किमतीचे २५ तोळे वजनाचे सोन्याचे दागीने हस्तगत करून चोरीचे ९ गुन्हे उघडकीस आणले बाबत,''

''गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी''

----------oooo----------

दिनांक ०३/०९/२०२६ रोजी सायंकाळी १७:०० वा चे सुमारास फिर्यादी महिला अंजनी दत्तात्रेय सुर्यवंशी, वय ७२ वर्षे, राह रू नं ३०२, एव्हरग्रीन हाईट्स, पारसीक नगर, कळवा, ठाणे. या खारेगाव नाका ते ओझोन व्हॅली बसस्टॉप असा बसने प्रवास करीत असताना त्यांच्या आजुबाजुला उभ्या असलेल्या तीन महिला यांनी आपसात संगनमत करून त्यांचे हातीतील पीशवीमधील १२ तोळे वजनाचे सोन्याचे दागीने ठेवलेली पर्स त्यांचे संमतीशिवाय लबाडीने चोरी करून नेलीबाबत कळवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. १२४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर प्रकाराचे गुन्हे परिमंडळ १ चे हद्दीत वारंवार घडत असल्याने मा. वरिष्ठांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपासात गुन्हे शाखा घटक १, ठाणे कडुन करण्यात येत असताना गुन्हे शाखा घटक १ चे **पोहवा/४१७४ संदीप महाडिक, पोशि/८०६६ प्रशांत लवटे, पोशि/२७५५ अमोल ढावरे** यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासुन त्याआधारे मोठया मेहनतीने यातील महीला आरोपीताबाबत खात्रीलायक माहिती प्राप्त करून **पो.उप.निरी. प्रकाश शिरसाठ** व पथक यांनी यातील महिला आरोपीत नामे १) संगीता दशरथ पीठकर, वय ४५ वर्षे, रा.ठि. रू नं ४०५, दत्तकृपा सोसायटी, वडारवाडा, अपना बाझार जवळ, मुलुंड पश्चिम, मुंबई. मुळगाव रामनगर, सोलापुर २) सुरेखा बजरंग गायकवाड, वय ४७ वर्षे, राह. परशुराम चाळ, राजे इंडस्ट्री, गवाण पाडा, मुलुंड पश्चिम, मुंबई. मुळगाव रामनगर, सोलापुर यास योग्य प्रकारे सापळा रचुन ताब्यात घेवुन प्रस्तुत गुन्हयामध्ये दिनांक ०७/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचे कडे **व.पो.नि./सचिन गायकवाड, पो.उप.निरी./प्रकाश शिरसाठ** यांनी केलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये अटक आरोपीत यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयातील कळवा, राबोडी, ठाणे नगर, नौपाडा पोलीस स्टेशन हददीमध्ये मागील ०२ वर्षापासुन एकुन ९ गुन्हे केल्याचे निष्पन्न करून आरोपीत यांचे कडुन सदर गुन्हयांत चोरी केलेले **३७,१९,०००/- रूपये किमतीचे २५ तोळे वजनाचे सोन्याचे दागीने हस्तगत केले आहेत.**

उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे

अ.क्र.	पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नंबर व कलम
१	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. १२४/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
२	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ९१९/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
३	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. १६९/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
४	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. २५६/२०२४ भा.द.वि. कलम ३७९
५	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ८४७/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
६	कळवा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ३६१/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
७	ठाणे नगर पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ०८/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
८	राबोडी पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ४८७/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२),३(५)
९	नौपाडा पोलीस स्टेशन	गुन्हा रजि. नं. ६२०/२०२४ भा.द.वि. कलम ३७९

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सचिन गायकवाड, पो.उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ, श्रे.पोउप निरी. दिपक जाधव,पोहवा/अविनाश पाटील, पोहवा/ संदिप महाडिक, पो.हवा./नंदकुमार पाटील, पोहवा/धनंजय आहेर, चा.पोहवा/शशिकांत सावंत, म. पोहवा./मलीका बहीरम, मपोहवा/दिपाली जाधव, मपोना/सुनीता चव्हाण, मपोना/शारदा भारती, पोशि/प्रशांत लवटे, पोशि/अमोल ढावरे, पोशि/सागर सुरळकर यांनी केली आहे.